दैनिक हेराल्ड

बुधवार, ११ जून २०१४ 9
Dainik Herald, Wednesday, June 11, 2014

# श्नायडर इलेक्ट्रिकतर्फे पर्यावरण दिन साजरा




जागृती कार्यक्रमात सहभागी झालेल्या तारा केरकर. सोबत डॉ. वल्लभ धायमोडकर, सर्वेश परब व इतर.

**पणजी, दि. १० (पत्रक):**

श्नायडर इलेक्ट्रिक इंडिया प्रा. लि. या कंपनीतर्फे नुकताच जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ऊर्जा बचत व पाणी बचत ही या कार्यक्रमाची मुख्य थिम होती. गोवा वाहतूक पोलिस यांच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमात रस्ता सुरक्षेबाबत जागृती करण्यात आली. त्याचबरोबर वेर्णा आणि नागोवा येथे कचरा गोळा करण्याची मोहिमही राबविण्यात आली. श्नायडरतर्फे २ जून ते ६ जून दरम्यान विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

'पाणी वाचवा, जीवन वाचवा' या विषयावर खास जागृती करण्यात आली. लिला टेक्नोलॉजीचे संचालक प्रदीप सरमुकादम यांच्या 'साप हे निसर्गाचे खास मित्र आहेत' या विषयावर मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमावेळी तारा केरकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्यासमवेत डॉ. वल्लभ धायमोडकर, सुनील शेट, श्नायडर इलेक्ट्रिक प्रायवेट लिमिटेडच्या प्रकल्प प्रमुख सुवर्णा जनार्धनन, सर्वेश परब उपस्थित होते.